# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.05.2026** **वार:बुधवार**

---

1. भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यानची सर्वसमावेशक सामरिक भागीदारीसंदर्भात चर्चा
2. अमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी सहा महिन्यांत 'अँटी-ड्रोन' यंत्रणा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न : गृहमंत्री अमित शाह यांची ग्वाही
3. अमेरिका आणि इराण यांच्यातील मध्यस्थ म्हणून पाकिस्तानच्या भूमिकेवर अमेरिकेचं प्रश्नचिन्ह आणि
4. व्हिएतनाममधील कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटूंना सुवर्णपदक

**<u>एस जयशंकर</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान सर्वसमावेशक सामरिक भागीदारीच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्लीत ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रमंत्री पेनी वोंग यांच्यासोबत 17 व्या बैठकीत चर्चा केली. अणुऊर्जा निर्मितीसाठी लागणाऱ्या युरेनियम पुरवठ्यासह ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवणं तसंच दुर्मिळ खनिजांच्या क्षेत्रातील व्यापार वृध्दी संदर्भात झालेली चर्चा ही मैलाचा दगड असल्याचं जयशंकर यांनी सांगितलं.

हिंद प्रशांत क्षेत्राशी संबंधित प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर चर्चा करण्यासाठी नवी दिल्ली इथं झालेल्या क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीदरम्यान, विविध मुद्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. सागरी आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक समृद्धी, उदयोन्मुख तंत्रज्ञान तसंच मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण या क्वाड सहकार्याच्या स्तंभांवर चर्चा करण्यात आली. असं परराष्ट्र मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव के. नागराज नायडू पत्रकार परिषदेत सांगितलं. दहशतवादविरोधी कारवाई हा क्वाड सहकार्याचा एक महत्त्वपूर्ण स्तंभ आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत असल्याचं याबैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात नमूद केलं आहे.

**<u>अमित शहा</u>**

केंद्र सरकार ड्रोनद्वारे होणारी अमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची तस्करी रोखण्यासाठी, पुढील सहा महिन्यांत 'अँटी-ड्रोन' अर्थात ड्रोन-विरोधी यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करत आहे. असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल सांगितलं. राजस्थानच्या बिकानेर जिल्ह्यातील 'सांचू' सीमा चौकीवर सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना संबोधित करताना ते बोलत होते. सीमेपलीकडून निर्माण होणारे धोके जरी अत्यंत महत्त्वाचे असले, तरी देशांत राहून अशा धोक्यांना मदत करणाऱ्या घटकांकडेही तितकेच गांभीर्याने लक्ष दिले जाणे आवश्यक आहे. अशा कृत्यांमध्ये सहभागी असलेल्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जावी, असेही त्यांनी नमूद केले. सीमेची सर्वसमावेशक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सीमा सुरक्षा दल, सशस्त्र दले, स्थानिक प्रशासन आणि नागरिक यांचा समावेश असलेली, चार-सूत्रीय बहुस्तरीय सुरक्षा यंत्रणा असणे अनिवार्य आहे. असंही त्यांनी नमूद केलं.

**<u>केंद्रीय समिती</u>**

घुसखोरी आणि इतर कारणांमुळे होणाऱ्या लोकसंख्याशास्त्रीय बदलाच्या आव्हानाचं निवारण करण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात

ही माहिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती प्रकाश नाओलेकर या समितीचे अध्यक्ष आहेत. लोकसंख्या बदलामुळे कोणत्याही देशाच्या सार्वभौमत्व, सुरक्षा तसंच कायदा आणि सुव्यवस्थेपुढे पुढे गंभीर आव्हान उभं राहातं; आणि ही समिती अशा बदलांचं समग्र मूल्यांकन करेल, असं अमित शहा यांनी या संदेशात म्हटलं आहे.

**पियुष-गोयल**

भारत-कॅनडा आर्थिक भागीदारीचा पुढील अध्याय हा 'विश्वासा'वर आधारित असेल, ज्यामुळे दोन्ही राष्ट्रांची सामायिक समृद्धी साधली जाईल. असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल व्यक्त केला. कॅनडातील टोरंटो इथं आयोजित 'राजकीय पुनर्रचनेपासून ते व्यावसायिक अंमलबजावणीपर्यंत' या उद्घाटनपर मंत्रीस्तरीय सत्राला संबोधित करताना ते बोलत होते.

**प्रकल्प गुंतवणूक**

महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने सुमारे 89 हजार 731 कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय काल राज्य सरकारनं घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे 20 हजार प्रत्यक्ष आणि  अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. या बैठकीला  उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते

**पंतप्रधान-12 वर्षे कार्यकाल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारला त्या घटनेला काल 12 वर्षे पूर्ण झाली. 26 मे 2014 रोजी मोदी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या 12 वर्षांत, 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या तत्त्वांवर आधारित, अनेक लोकभिमुख उपक्रम राबवले आहेत. या काळात, केंद्र सरकारने परराष्ट्र धोरण, दहशतवादविरोधी मोहिमा आणि डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी चळवळींविरुद्धची कारवाई यांसह राष्ट्रीय सुरक्षेवरही विशेष भर दिला असून, वारसा जतन, संस्कृती, पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण या क्षेत्रांवरही लक्ष केंद्रित केलं आहे.

**पाकिस्तान**

अमेरिका आणि इराण यांच्यातील मध्यस्थ म्हणून पाकिस्तानच्या भूमिकेवर अमेरिकेचे सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. इस्रायलला असलेल्या पाकिस्तानच्या दीर्घकालीन विरोधामुळे त्याला तटस्थ मानले जाऊ शकत नाही, असं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे. ग्रॅहम यांनी पाकिस्तानला, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अब्राहम करारात सामील होण्याच्या केलेल्या आवाहनाला प्रतिसाद द्यावा असं आवाहनही केलं आहे. दरम्यान, देशाच्या मूलभूत विचारधारेच्या विरोधात जाणाऱ्या कोणत्याही कराराला पाकिस्तान पाठिंबा देणार नाही, पाकिस्तान अब्राहम करारात सामील होण्याची शक्यता नसल्याचं पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी दूरचित्रवाणी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं.
या पार्श्वभूमीवर ग्रॅहम यांनी हे आवाहन केलं आहे.

**नासा**

अमेरिकेच्या अंतराळ संशोधन संस्था नासाने चंद्रावर तळ उभारण्याच्या योजनेचा भाग म्हणून चंद्रावर पाठवल्या जाणाऱ्या रोबोटिक लँडर्स, हॉपिंग ड्रोन्स आणि वाहनांचा तपशील प्रकाशित केला आहे. ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस

यांची अवकाश कंपनी 'ब्लू ओरिजिन' ही यंत्रं तयार करण्यासाठी निवडलेल्या अनेक कंपन्यांपैकी एक आहे. 2028 मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी अमेरिकेला आपल्या नागरिकांना पुन्हा चंद्रावर उतरवायचे आहे. चंद्राच्या पृष्ठभागावर मानवांना परत पाठवण्यासाठी नासा बरोबर चीन स्पर्धेत आहे.

**सीबीएसई**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीमध्ये कोणताही सुरक्षा भंग झालेला नाही. असं मंडळानं स्पष्ट केलं आहे. cbse.onmarks.co.in ही URL केवळ अंतर्गत चाचणी आणि पुनरावलोकनाच्या उद्देशाने नमुना माहिती असलेली चाचणी साइट आहे.

**कांदा दर**

केंद्र सरकारनं साठवणूक केलेला कांद्याच्या किमान हमी खरेदी दर बाराशे सत्तर रुपये प्रति क्विंटलवरून वाढवून तो पंधराशे ऐंशी रुपये प्रति क्विंटल असा केला आहे. कांदा खरेदीदराबाबत विविध राज्य सरकारांच्या आलेल्या विनंतीवरून हा निर्णय काल घेण्यात आला. या दरांची तत्काळ अंमलबजावणी होणार असून, यासंदर्भात ग्राहक व्यवहार, मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिल्लीत ग्राहक व्यवहार विभाग, नाफेड आणि एनसीसीएफच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. त्यानंतर समाज माध्यमांवरील संदेशात ही माहिती दिली.

**कुस्ती**

व्हिएतनाममधील दा नांग इथं सुरू असलेल्या 23 वर्षांखालील आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धे'त भारतीय कुस्तीपटूंनी काल पुरुषांच्या 'फ्रीस्टाईल' गटात दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि एक कास्य पदक पटकावले. 65 किलो वजनी गटात, मोहित कुमार सुवर्णपदकावर नाव कोरले. 79 किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत, चंदर मोहननेही सुवर्णपदक जिंकले.

**हवामान**

मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश तसंच ईशान्येकडील काही भागांत तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात विदर्भातील अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये आज उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. ब्रह्मपुरी, गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये काल 46 अंश सेल्सिअसपर्यंत तापमानाची नोंद झाली. हवामान विभागाने रविवारपर्यंत बिहार, कर्नाटक आणि ईशान्य भारताच्या काही भागांत मुसळधार पाऊसाचा अंदाज वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.